नि. फौजदारी खटला क्र. <u>५३/२०२५</u>
सरकार विरूद्ध आनंद दादाराव
**निशाणी १२**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. २ ची जबानी</u>**

सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो/करते की,

माझे नाव : मनिष कैलास येउलकर,
वय : ३२ वर्षे,
धंदा : मजुरी,
राहणार : सोमवार वेस, अकोट, ता. अकोट, जि. अकोला.

**सरतपासणी — अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती पी. एल. हरणे यांचेमार्फत —**

दि. २६/१०/२०२४ रोजी पोलीसांनी मला अकोट शहर पोलीस ठाण्यात बोलवले होते. माझेसमक्ष पोलीसांनी घ टनास्थळ पंचनाम्याची कोणतीही कारवाई केली नाही. पंचनामा लिहुन तयार होता. मला पोलीसांनी त्यावर सही करण्यास सांगितले म्हणुन मी सही केली. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखवला. त्यावर माझी अनु क्र. १ वर सही आहे. परंतु मला त्यातील मजकुर माहित नाही.

२. माझे समक्ष पोलीसांनी दि. २६/१०/२०२४ रोजी जप्तीची कोणतीही कारवाई केली नाही. आता मला जप्ती पंचनामा दाखवला. सदर जप्ती पंचनाम्यावर देखील अनु क्र. १ वर माझी सही आहे. परंतु मला त्यातील मजकुर माहित नाही.

***(साक्षीदार पुर्वीच्या जबाबाशी विसंगत कथन करीत असल्यामुळे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी सदर साक्षीदारास भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी दिली.)***

३. हे म्हणणे खरे नाही की, दि. २६/१०/२०२४ रोजी अकोट शहरात अलायन्स चर्च या ठिकाणी पोलीसांनी मला घ टनास्थळ पंचनामा करण्यासाठी बोलवले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी त्याठिकाणी घटनास्थळाची पाहणी करून माझेसमक्ष घ टनास्थळ पंचनामा तयार केला व तो वाचुन मी त्यावर सही केली होती.

४. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझेसमक्ष त्याच घ टनास्थळावर आरोपी आनंद दादाराव डिक्कर याचे ताब्यातुन लाकडी मुठ असलेल्या तीन तलवारी जप्त केल्या होत्या व त्याबाबत माझेसमक्ष जप्ती पंचनामा तयार केला व तो वाचुन मी त्यावर सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी दोन्ही पंचनामे माझेसमक्ष तयार केले होते व मी वाचुन–समजुन त्यांवर सह्या केल्या होत्या. मी दहावा वर्ग शिकलो असुन कुठलाही दस्त वाचुन समजुन घेतल्याशिवाय सही करत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचवण्यासाठी खोटी साक्ष देत आहे. **सरतपास पुर्ण.**

**उलटतपासणी — आरोपीतर्फे ॲड. आर. व्ही. कुळकर्णी यांनी नाकारली**

**फेरतपासणी — काही नाही.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**

दि. ०५.०१.२०२६
अकोट

(ए.ए. माळी)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र. २)
अकोट, ता. आकोट, जि. अकोला.